माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- २७८५ दिनांक :- ५/११/२०२०

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.२०.१०.२०२०

१. अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा),
राहणार :- तारा अपार्टमेंट, फ्लॅट नं. ६, दुसरा मजला,
महर्षीनगर, पुणे ४११०३७.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

श्री भरत ब. जैन (सुराणा)
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका.

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा)यांनी दिनांक २६/०८/२०२० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका यांचेकडे मा.नगरसेवकांनी श्री.भरत सुराणा यांचे माहिती अधिकार अर्जाबाबत मागविलेल्या माहितीच्या प्रति मिळणेकामी अर्ज केला होता.

अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे ५२ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/- रुपये प्रमाणे एकूण १०४/- रु. रक्कमेचा भरणा केलेनंतर माहिती उपलब्ध करून दिली जाईल असे पत्र जा.क्र.१८८५ दि.०८/०९/२०२० अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| २६/०८/२०२० | २५/०९/२०२० | ०८/०९/२०२० | १०/०९/२०२० | १०/०९/२०२० |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्री सुराणा यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे– ''दिलेली माहिती अपुरी आहे. तसेच माझी माहितीच्या अर्जाची माहिती त्रयस्थ व्यक्तीला दिली असून त्याने मला व माझ्या परिवाराच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. तरी, ती माहिती कोणत्या नियमाखाली दिली त्याचे पत्र दिले नाही.''

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ०९/१०/२०२० | २५/०९/२०२० | होय | – | १९/१०/२०२० |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :– दि. २०/१०/२०२० रोजी दुपारी ०४.३० वाजता.

सुनावणीस अपिलकर्ता :– उपस्थित

सुनावणीस जनमाहिती अधिकारी :– उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | मा.नगरसेवकांनी श्री.भरत सुराणा यांचे माहिती अधिकार अर्जाबाबत मागविलेल्या माहितीच्या प्रति मिळणेकामी अर्ज केला होता. | कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे ५२ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/– रुपये प्रमाणे एकूण १०४/– रु. रक्कमेचा भरणा केलेनंतर माहिती उपलब्ध करून दिली जाईल असे पत्र जा.क्र.१८८५ दि.०८/०९/२०२० अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक , कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले. |

## विवेचन

१. ''माझी वैयक्तिक माहिती मला न विचारता त्रयस्थ व्यक्तिला कोणत्या नियमाखाली देणेत आली याबाबत अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा) यांनी विचारणा केली असे. सदर माहिती मा.सभासदांना दिली असलेने त्यांचेपासून माझ्या व माझ्या परिवाराच्या जीवितास धोका आहे'' असे अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा) यांनी नमूद केले.

२. ''मा.सभासदांना पुरविलेली माहिती वैयक्तिक नसून सदर माहिती कार्यालयातील सार्वजनिक अभिलेख आहेत. तसेच मा.सभासदांचा माहिती अधिकार अर्ज नसून साधा लेटर हेडवरील अर्ज आहे. त्यामुळे सदर अर्जास माहिती अधिकार अर्जाचे नियम लागू केले नाही त्यामुळे श्री भरत सुराणा यांची परवानगी न घेता मा.सभासदांना माहिती पुरविली गेली.'' असे जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी यांनी सांगितले.

३. सदर माहिती तत्कालीन महापालिका सहाय्यक आयुक्त तथा उप अभियंता, परिमंडळ क्र.५ यांचे स्वाक्षरीने मा.सभासद सौ.राजश्री शिळीमकर यांना देणेत आलेली असलेने कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडील पत्र जा.क्र.२५४४ दि.२२/१०/२०२० ने तत्कालीन महापालिका सहाय्यक आयुक्त श्री.रविंद्र घोरपडे यांना पत्र देवून त्यांचे लेखी म्हणणे कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडे कळविणेबाबत सांगितले.

४. जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, कोंढवा येवलेवाडी यांनी दि.२९/१०/२०२० चे पत्रान्वये खालीलप्रमाणे त्यांचे लेखी म्हणणे सादर केले आहे. ''माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत कलम ८(१)(त्र) अन्वये शासनाकडे दैनंदिन शासकिय कामकाजाचा भाग म्हणून येणारी प्रत्येक माहिती खाजगी राहू शकत नाही कारण ती सार्वजनिक कामकाजाचा भाग म्हणून जमा केली जाते तेव्हा ती सार्वजनिक स्वरूपाची माहिती ठरण्याची शक्यता निर्माण होते. म्हणजेच सदरची माहितीचे रुपांतर सार्वजनिक अभिलेखामध्ये होते व सदरचे अभिलेख कार्यालयाकडे उपलब्ध असल्याने तसेच मा.सभासद सौ.राजश्री शिळीमकर हे महानगरपालिकेचे ट्रस्टी असल्याने त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अन्वये महानगरपालिकेची कोणतीही माहिती विचारण्याचा अधिकार असल्याने सदरची माहिती मा.सभासद यांना देणे प्रशासनास बंधनकारक आहे. त्यामुळे त्यांना सदरची माहिती देणेत आली आहे याबाबत श्री भरत सुराणा(जैन) यांना पत्र देण्याची आवश्यकता आम्हास भासली नाही.''

५. दि.२२/१०/२०२० चे पत्रानुसार तत्कालीन महा.सहा.आयुक्त तथा उप अभियंता, परिमंडळ क्र.५ यांनी कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयास खालीलप्रमाणे लेखी म्हणणे कळविले आहे.

''माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ८(माहिती प्रकट करणेबाबत) यामध्ये कायदा माहितीचा अन् अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हे अधिकृत पुस्तक यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांनी प्रकाशीत केलेले आहे. यामध्ये खाजगीपणाचा अधिकार अंतर्गत पृष्ठ क्र.८६ वर पुढील प्रमाणे उल्लेख आहे. 'शासनाकडे दैनंदिन शासकीय कामकाजाचा भाग म्हणून येणारी प्रत्येक माहिती खाजगी राहू शकत नाही. कारण ती सार्वजनिक कामकाजाचा भाग म्हणून जमा केली जाते, तेव्हा ती सार्वजनिक स्वरूपाची माहिती ठरण्याची शक्यता निर्माण होते.'

वरील बाब विचारात घेवून माहिती अधिकाराखाली दाखल झालेले अर्जांवर आवक क्रमांक पडत असून हे अर्ज सार्वजनिक अभिलेख म्हणून सार्वजनिक कामकाजाचा भाग होत आहेत. यानूसार दाखल अर्जातील कोणतीही माहिती खाजगी स्वरूपाची राहत नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४४ नूसार पुणे मनपाचे पालिका सदस्याला या अधिनियमाची अंमलबजावणी किंवा शहरातील मनपाचा कारभार यासंबंधिच्या कोणत्याही बाबी संबंधी प्रश्न विचारता येतील, असा उल्लेख केलेला आहे. यानूसार मा.सभासद सौ.राजश्री शिळीमकर यांना कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखानूसार माहिती देण्यात आली.

महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्र.विमंस-२०१३/प्र.क्र.६७/१८(र.व.का.) दि.२७ जुलै २०१५ नूसार लोकप्रतिनिधी सदस्यांचे पत्रावर सत्वर कार्यवाही करणेचे आदेश दिलेले आहेत. या परिपत्रकामधील क्र.१ नूसार

सन्माननीय लोकप्रतिनिधींना त्यांची संविधानिक कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने त्यांना मदत करताना प्रयत्नांची शिकस्त करणे अपेक्षित आहे. क्रमांक ४ नुसार लोकप्रतिनिधी सदस्यांच्या पत्रांवर सत्वर कार्यवाही करून अंतिम उत्तर देणेत यावे याचा उल्लेख आहे. क्र.७ नूसार लोकप्रतिनिधी सदस्यांना माहिती पुरविणे यामध्ये सदस्य यांनी त्यांची संसदीय कामकाज विषयक कर्तव्ये पार पाडण्यासाठी जनतेच्या कल्याण विषयक बाबीसंबंधीच्या माहितीची मागणी केल्यास सदर माहिती त्यांना पुरविणेत यावी.

शासन परिपत्रक क्र.विमंस २०२०/प्र.क्र.३६/१८(र.वका.) दि.२१ ऑक्टोबर २०२० मधील क्र.२ नूसार लोकप्रतिनिधी सदस्य यांचे निवेदनावर कार्यवाही करणेचा उल्लेख केलेला आहे. या परिपत्रकासोबत अन्य शासन परिपत्रक क्र.१ ते ७ चा उल्लेख केलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४४, महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्र.विमंस-२०१३/प्र.क्र.६७/१८(र.व.का.) दि.२७ जुलै २०१५ व शासन परिपत्रक क्र.विमंस २०२०/प्र.क्र.३६/१८(र.वका.) दि.२१ ऑक्टोबर २०२० मधील (क्र.१ ते ७) नूसार लोकप्रतिनिधी पुणे मनपाचे सभासद मा.सौ. राजश्री शिळीमकर यांचे लेखी अर्जानूसार त्यांना माहिती देणेत आली.''

## -: आदेश :-

उपरोक्त विवेचनामधील जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, कोंढवा येवलेवाडी व तत्कालीन महा.सहा.आयुक्त तथा उप अभियंता, परिमंडळ क्र.५ यांचे लेखी म्हणणे अवलोकन केलेनंतर मा.सभासदांना देणेत आलेली माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४४ मधील तरतूदीन्वये देणेत आलेली आहे.

तरी, अपिलार्थी यांनी अपिल अर्जात नमूद केलेप्रमाणे मा.सभासदांना माहिती कोणत्या नियमाखाली देणेत आली याची माहिती जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, कोंढवा येवलेवाडी यांनी लेखी कळवावे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, कोंढवा येवलेवाडी यांना उपरोक्त आदेश देवून अपिल निकाली काढण्यात येत आहे.

५/११/२०

(तानाजी नरळे)
अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त,
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

दिनांक आणि ठिकाणः ०५/११/२०२०,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-१. अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा),
राहणार :- तारा अपार्टमेंट, फ्लॅट नं. ६, दुसरा मजला,
महर्षीनगर, पुणे ४११०३७.

२. श्री अशोक महाजन,
जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......